**राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या धडक सिंचन विहीर योजनेतील रद्द करण्यात आलेल्या विहिरी परत सुरु करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**नियोजन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक- योजना-२०१५/प्र.क्र.२८(३)/रोहयो-५**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२**
दिनांक- २७ नोव्हेंबर.२०१५ ,

**वाचा :-**

शासन निर्णय क्रमांकः योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २३ जानेवारी, २०१४.

**प्रस्तावना**

राज्य रोजगार हमी योजने अंतर्गत विदर्भातील ६ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये धडक सिंचन विहिर योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना अनुदान स्वरुपाची प्रतिपूर्ती योजना आहे. या योजने अंतर्गत सन २००७-०८ मध्ये ८३,२०० विहिरींचा लक्षांक देण्यात आला होता. धडक सिंचन विहीर कार्यक्रमातील देण्यात आलेल्या लक्षांकाचा आढावा सन २०१३ मध्ये घेण्यात आला. या योजनेअंतर्गत पूर्ण व अपूर्ण विहीरी संदर्भात तसेच लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या अनुदानाबाबत माहिती प्राप्त करुन घेण्यात आली. उपआयुक्त (रोहयो), उप जिल्हाधिकारी (रोहयो), कार्यकारी अभियंता यांच्याशी चर्चा करण्यात आली. त्यानंतर उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी माहिती सादर केली. सदर माहितीनुसार डिसेंबर, २०१३ मध्ये एकूण २४,५२० अपूर्ण विहीरीपैकी अनुसुचित जाती / जमाती व लहान व सिमांत शेतकरी लाभार्थ्यांच्या ११५२९ विहिरी व उर्वरीत इतर लाभार्थ्यांच्या १२,९९१ विहिरी अपुर्ण होत्या. अपुर्ण असलेल्या विहिरिपैकी अनुसूचीत जाती / जमाती व लहान व सिमांत शेतकरी लाभार्थ्यांच्या विहीरी नरेगाअंतर्गत वर्ग करण्याचा, तसेच उर्वरित लाभार्थ्यांच्या धडक सिंचन विहिर योजनेअंतर्गत देय अनुदानात वाढ करण्याचा निर्णय दिनांक २३ जानेवारी २०१४ अन्वये घेण्यात आला आहे .

शासन निर्णय क्रमांक योजना-२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २३/०१/२०१४ अन्वये धडक सिंचन विहिर कार्यक्रमाअंतर्गत ज्या विहिरींना प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे, परंतू लाभार्थ्यांना कोणताही निधी वितरित करण्यात आलेला नाही अशा सर्व विहिरीं रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच अशा लाभार्थ्यांना पात्र असल्यास नरेगा अंतर्गत विहिरीसाठी अर्ज करण्यास मुभा देण्यात आली. त्याचप्रमाणे ज्या विहिरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे व लाभार्थ्यांना अग्रिम देण्यात आला आहे, तथापि ज्या लाभार्थ्यांना विहिरीची कामे करण्यात स्वारस्य नसेल अशा लाभार्थ्यांच्या विहिरी देखील रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

धडक सिंचन विहिर योजनेचा आढावा मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी यवतमाळ येथे घेतला. त्यावेळी धडक सिंचन विहीर योजनेतील रद्द केलेल्या विहीरीपैकी पात्र लाभार्थ्यांच्या काही विहीरी पुन्हा सरु करता येतील, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले त्यानुसार रद्द केलेल्या विहिरींची तपासणी जिल्हाधिकारी यांनी करावी व त्यापैकी पात्र लाभार्थ्यांच्या किती विहिरी पुन्हा सुरु करता येतील याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले, त्यास अनुसरुन जिल्हाधिकाऱ्यांनी तपासणी करुन पूर्वी रद्द केलेल्या १६,६६७ विहिरींपैकी ८,००७ विहिरी पुन्हा सुरु करता येणे शक्य असल्याचा अहवाल विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सादर केला आहे.

धडक सिंचन विहिर योजने अंतर्गत रद्द केलेल्या विहिरीं पैकी पुन्हा सुरु करता येणा-या विहीरीची कामे सुरु करून पूर्ण करणे, तसेच नरेगात वर्ग केलेल्या विहीरी परत धडक सिंचन विहीर योजनेत घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय**

राज्य रोजगार हमी योजने अंतर्गत विदर्भातील आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांमध्ये घेण्यात येणाऱ्या धडक सिंचन विहीर योजनेतील १६,६६७ विहिरी रद्द करण्यात आल्या आहेत. त्यापैकी ज्या विहीरी पुन्हा सुरू करता येणे शक्य आहे त्या विहीरी धडक सिंचन विहिर योजने अंतर्गत सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर विहीरी कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३० जून, २०१६ पर्यंत पूर्ण होणे बंधनकारक राहील.

२. धडक सिंचन विहिर योजनेतील पुन्हा सुरु करावयाच्या विहिरींसंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(अ) प्रत्येक विहिरीच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात यावी.

(ब) विहिरीच्या जागेत बदल असल्यास भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

(क) सर्व लाभार्थ्यांची कार्यशाळा आयोजित करण्यात यावी. त्यामध्ये योजनेची कार्यपध्दती, देण्यात येणारे अनुदान, विहीर पुर्ण करण्याचा विहित कालावधी, लाभार्थ्यांची कर्तव्ये, इत्यादी महत्वाच्या बाबी लाभार्थ्यास स्पष्टपणे सांगण्यात याव्यात.

(ड) उपरोक्त प्रमाणे विहीरी पुर्ण करण्याचा कालबध्द कार्यक्रम निश्चित करुन विहीरी दिनांक ३० जून,२०१६ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पुर्ण कराव्यात.

(इ) धडक सिंचन विहिर योजनेतील ज्या लाभार्थ्यांच्या विहिरी रद्द करण्यात आल्या आहेत त्यापैकीच ८००७ विहिरी परत सुरु करुन पुर्ण करण्यात याव्यात. यासाठी नव्याने लाभार्थ्यांची निवड करण्यात येऊ नये.

(फ) नरेगा अंतर्गत विहिरींची कामे पुर्ण करण्यासाठी प्रती तालूका १०० सिंचन विहिरी अपुर्ण असल्यास १ जादा तांत्रिक कंत्राटी अधिकारी तसेच ५०० पेक्षा जास्त विहिरी अपुर्ण असलेल्या ठिकाणी जास्तीत जास्त ५ जादा कंत्राटी तांत्रिक अधिकारी नेमण्यात आले आहेत. धडक सिंचन विहिरी पुर्ण करण्यासाठी त्यांच्या सेवा घेण्यात याव्यात. तथापि विहिरींची संख्या जास्त असल्यास आवश्यकतेनुसार जादा कंत्राटी कर्मचारी नियुक्त करण्याची मुभा राहिल.

३. हा कार्यक्रम पुर्णत्वास नेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची नोडल अधिकारी (Nodal Officer) म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संनियंत्रण करतील व त्यासाठी महिन्यातून एक बैठक घेतील.

४. धडक सिंचन योजनेतून नरेगात वर्ग केलेल्या विहीरी परत धडक सिंचन विहीर योजनेत सध्या वर्ग न करता त्या विहीरी नरेगाअंतर्गत विशेष मोहीम स्वरूपात दिनांक ३० एप्रिल, २०१६ पर्यंत पूर्ण करण्यात याव्यात. यासाठी आवश्यकतेनुसार कुशल कामासाठी लागणारा अतिरिक्त निधी राज्य रोहयो निधीतून उपलब्ध करून देण्यात येईल. या कामासाठी जादा मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात यावे. दिनांक ३० एप्रिल, २०१६ अखेर ज्या विहीर नरेगा अंतर्गत पूर्ण होऊ शकणार नाहीत त्या विहीरी त्या दिनांकापासून धडक सिंचन विहीर योजनेअंतर्गत वर्ग करून पूर्ण करण्यात याव्यात.

४. याबाबत होणारा खर्च सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. सदरचा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभाग यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३९७/२०१५/व्यय-८, दिनांक १४/१०/२०१५ अन्वये दिलेल्या सहमतीने व मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र राज्याच्या www.maharashtra.gov.in या वेब साईट वर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१५१११९१११७५२०७१६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने .**

**( प्रभाकर देशमुख )**
**सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव.

२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मंबई – ३२.
३) सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव.
४) सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
६) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
७) विभागीय आयुक्त, अमरावती/नागपूर.
८) जिल्हाधिकारी अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा.
९) उपजिल्हाधिकारी (रोहयो) अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा.
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा.
११) कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग, जिल्हा परीषद, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा.
१२) मा. सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१३) उप सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) सहाय्यक संचालक (लेखा), रोहयो-७, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग)/ निवड नस्ती रोहयो-५